RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal
ISSN 2582-9173
Website : www.researchhub.org.in/research-hub !! Email : researchhubjournal@gmail.com

# वृक्षवल्ली आम्हा सोयरे

**प्रा. संजय जीवनलाल सिंगनजुडे**
सहाय्यक प्राध्यापक
विमेन्स कॉलेज ऑफ आर्टस् ॲन्ड कॉमर्स, ३१०—ब, नवीन नंदनवन, नागपूर—४४००२४
Email :sanjayssinganjude@gmail
मोबाईल नं. : ९७६६९६२७२३

---

***सारांश :***

*पर्यावरणाची समस्या हा वर्तमानकाळातील ऐरणीचा प्रश्न आहे. एकीकडे विकासाचे गोडवे गायले जातात. तर दुसरीकडे देशाच्या विकासाकरिता पर्यावरणाची हानी होत आहे, याकडे जाणून दुर्लक्ष केले जाते. आज पर्यावरणाच्या घटकांची खऱ्या अर्थाने गरज आहे. जर याकडे दुर्लक्ष केले तर भविष्यात त्याचे दुष्परिणाम भोगावे लागतील. तेव्हा पर्यावरणातील सचेतन व अचेतन अशा दोन्ही गोष्टीविषयी लोकांमध्ये जागरुकता निर्माण करण्याची गरज आहे. आजची तरुणपिढी उद्याचे राष्ट्र घडवू शकते. त्याकरिता त्यांच्या समोर आज पर्यावरणाचे प्रश्न उपस्थित करून किंवा पर्यावरणीय विविध प्रश्नांविषयी जागरूकता निर्माण करणे गरजेचे आहे. यात शिक्षणक्षेत्र आणि साहित्याचा मोठा हातभार लागू शकतो यात कोणतीही शंका घेण्याचे कारण नाही. फक्त हे काम डोळ्यात अंजन घालून करण्याची गरज आहे. समाजमन जागृत करण्यात मराठी साहित्याचाही मोठा वाटा आहे. अगदी प्राचीन काळापासून पर्यावरणासंबंधी आपले किती घनिष्ट नाते आहे हे संत तुकारामांनी आपल्या अंभगाद्वारे सांगितले आहे. ते म्हणतात,*

‘वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरी
पक्षीही सुस्वरे आळविती’

या काव्यपंक्तीद्वारे तुकाराम मानव आणि वृक्षवल्ली, पक्षी ही सर्व आपली सगेसोयरी आहेत. मनुष्याच्या गरजा पर्यावरणावर आधारित असतात. त्यामुळे संतानाही वृक्षवल्ली, पशुपक्षी यांच्या रक्षणाचा संदेश दिला आहे. त्यांनी सांगितलेल्या मार्गाचा अवलंब करून निसर्गाला कसे समृद्ध करता येईल, प्रदुषण मुक्त करता येईल. याचा ध्यास घेण्याची गरज आहे. संतांनी दिलेली ही शिकवण शिक्षणाच्या माध्यमातून तरुणपिढी प्रयत्न पोहचवणे गरजे आहे.

मराठी साहित्यात मला अवगत असलेले पर्यावरणीय प्रश्न येथे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठी साहित्यात निसर्ग, पर्यावरणाला अनुषंगून बरेच लेखन झालेले आहे. त्यात संत ज्ञानेश्वर, तुकाराम, एकनाथ, आधुनिक साहित्यात महात्मा फुले, केशवसुत, बालकवी, मर्ढेकर, कुसुमाग्रज, उद्धव शेळके, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गाडगेबाबा, गो. नी. दांडेकर, भालचंद्र नेमाडे, मारुती चितमपल्ली, सदानंद देशमुख आदींचा हातभार आहे.

तरी वरील काही लेखकांच्या साहित्यकृतींचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**विषय विवेचन :**

भालचंद्र नेमाडे हे मराठी साहित्यातील नावाजलेले लेखक आहे. देशीवादाचे पुरस्कर्ते आहेत. नेमाडे यांच्या 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' ह्या कादंबरीत पर्यावरणाचे चित्रण येते. त्यात लभान्या स्त्रीया जंगलातून फिरून औषधीउपयोगी वनस्पती शोधून आणून लोकांचा उपचार करतात. अर्थात ह्या औषधी वनस्पती जंगलातून मिळतात. परंतु काळाच्या ओघात जंगलतोड झाल्याने औषधोयोगी वनस्पतीचा ऱ्हास होत आहे.

'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीमध्ये मोरवाडीच्या निसर्गाचे वर्णन येते की, 'खरं तर चित्ते, वाघ, हत्ती, गेंडे, अजगर, साप हे प्राणी नाहीसे करण्याचे पाप ह्या कृ कृषिसंस्कृतीचंच आहे. अरण्य शेतीखाली आली, हे मोठाले प्राणी नाहीसे केले...' 'काही मेंढ्यांचे आपापल्या पिल्लांना हाका मारणारे आवाज, लुचणारी काकरं—रेनीच्या घरामागचा मेंढवाडा, टेकडीखालच्या पळसाच्या रानातलं कुरण, ज्याच्यात पक्ष्यांची, वनस्पतींची नानाविध कुळ नांदत असतात. तेव्हा लांब कुठेतरी निळ्या आभाळाला लागून क्षितिजावरच कितीतरी छान असेल, असं वाटायचं वय...' 'कोसला' कादंबरीमध्ये पांडुरंग सांगवीकर ग्रामीण भाग आणि शहरी भागातील वर्णन केले आहे. शहरी भागातील विकास, डांबरी रस्ते ह्यातून शहराचा विकास होत आहे. ही बाब खरी असलीतरी शहरी भागातील लोकांचे नाते आपल्या भूमीशी तुटत आहे. त्यांच्याकरिता पैसा ही बाब महत्त्वाची ठरलेली दिसते. ते धान्य दुकानातून विकत आणतात. परंतु ते धान्य दुकानात कुठून येते ही गोष्ट शहरी लोकांना माहीत नाही असे पांडुरंग सांगवीकर कादंबरीत सांगतो. यातून शहरी भागातील लोक पर्यावरणापासून कसा दुरावाला आहे हे सांगतो. कादंबरीच्या माध्यमातून नेमाडे वास्तव मांडून निसर्ग, खेडी, पर्यावरण यांचे महत्त्व अप्रत्यक्षपणे सूचित करतात. असे कितीतरी वर्णन नेमाडे यांच्या 'हिंदू' कादंबरीदेखील निसर्गाचे वर्णन येते. हे आपल्या भूमीशी नाते सांगणारे देशीयतेशी नाते जोडणारे वर्णन नेमाडे आपल्या कादंबऱ्यांतून करतात. जे तुकारामच्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' याच्याशी नाते सांगणारे आहे. अशीच कृषिसंस्कृतीतील माणसाची ओळख सांगताना नेमाडे 'हिंदू'मध्ये दर्शवतात, 'खंडेराव, तू इतका क्षूद्र नाही आहेस. घराला अंगण आणि दारी पिपंळ ही तुझी ओळख, ऊन, पाऊस, चांदणं, जमीन, गवत, पशूपक्षी, प्राणी, झाडझुडपं, लोकगीतं, दंतकथा, वाक्प्रचार हे काहीच नसलेला झगझगीत वांझ परिसर तुला चालेल? भरकटू नकोस, तुझे पाय शाबूत ठेव. सगळे रस्ते आपले पाय गिळण्याची वाटच पाहत असतात. हवाई, समुद्री, जमिनी, रूळ, महामार्ग, सडका, यंत्रांनी संध्याकाळपर्यंत कुठल्या कुठे नेऊन टाकणारे लंडन, न्युयॉर्क, चंद्रावरसुद्धा; पण तुला वाचवेल तुझी पायवाट. ती तुला कधी सोडून जाणार नाही. कारण तूच ती तयार करतोस तीच घे. जहाजावरून सोडलेला कावळा जसा परत जहाजावर येतो, जशी वादळी पावसात मुंगी आपल्या पूर्वजांच्या वारूळाकडे लगबगीनं धावत येते....' हे 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ' या कादंबरीतील वर्णन आपली अस्सल भारतीय संस्कृतीची पर्यावरणमूलक वर्णन करणारे आहे, संस्कृती जोपासणारी आहे. घराला अंगण आणि दारी पिंपळ ही आपली ओळख आज आधुनिकीकरण व जागतिकीकरणाच्या भोवऱ्यात सापडून संपते की काय अशी भीती वाटायला लागलेली आहे. तेव्हा नेमाडे खंडेरावला सांगतात की, आपल्याला

वाचवणारी पायवाट ही पर्यावरणमूलकच आहे. तीच ह्या जागतिकीकरणाच्या भोवऱ्यातून वाचवू शकते. तेव्हा मानवानी कितीही विकास केला तरी शेवटी त्याला निसर्गाला शरण यावे लागेल. हे वरील अवतरणावरून सूचित होते.

नेमाडे यांच्याप्रमाणे निसर्गाचे व त्यातील पशू, पक्षी, कीटक, वनराई याचे वर्णन करणारे लेखक मारुती चितमपल्ली यांनी 'केशराचा पाऊस' व 'निसर्गवाचन' हे ग्रंथ प्रसिद्ध आहेत. 'केशराचा पाऊस' या कथासंग्रहातील बहुतेक कथांची पार्श्वभूमी ही मेळघाटातील जंगलांची आहे. तिथल्या जंगलात ते रात्रंदिवस जिज्ञासेने फिरले. तेथील आदिवासी कोरकू, गोंड व निहाल तसेच गवळी यांच्यासोबत अहोरात्र जंगलात भ्रमंती त्यांनी केली. या कथांतून जंगल, वृक्ष, लता व वेली याविषयी त्यांचे चिंतन व मनन प्रकटले आहे. 'निसर्गवाचन' या ग्रंथात पर्यावरणाच्या सानिध्यात राहणाऱ्या प्राण्यांचे, पक्ष्यांचे वर्णन आले आहे. ते वाचकांच्या माहितीत भर टाकणारे आहेत. निसर्गाची — जंगलाची व त्या जंगलाच्या कुशीत राहणाऱ्या पशुपक्ष्यांची अगदी जवळून माहिती पूरविणारा अक्षर वाङ्मयच म्हणता येईल.

मराठीतील असे बरेच लेखक कवी आहेत की त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून समाजजीवनाला काही न काही देण्याचा नेहमी प्रयत्न केलेला आहे. त्यांचे विचार नेहमी प्रेरणादायी असे राहिले आहे. अनेक विषयांपैकी पर्यावरण ह्याही विषयाचा समावेश त्यात आहे. असेच एक महत्त्वाचे लेखक म्हणून महात्मा जोतिराव फुले यांच्या साहित्याचा विचार करता येतो. त्यांचे शेतीविषयक विचार आधुनिक काळात प्रेरक ठरणारे आहेत. ह्या त्यांच्याविचारात पर्यावरणसंवर्धनासंबंधी विचारांचाही समावेश होतो. महात्मा फुले आपल्या 'शेतकऱ्याचे असूड' या ग्रंथात शेतकऱ्याचे प्रश्न मांडलेले आहे. त्याच अनुषंगाने पर्यावरणाचे जतन कसे करता येईल हेही अप्रत्यक्षरित्या सूचित करणारे आहे. तत्कालीन सांप्रत सरकारला ते खडे बोल सुनावतात व शेतकऱ्याचे प्रश्नांकडे लक्ष वेधतात. महात्मा फुले यांच्या लेखनातून जलसंर्वधनाविषयी माहिती येते. ते म्हणतात, 'एकंदर डोंगर पर्वतांवरील गवत झाडाच्या पानफुलांचे, व मेलेल्या कीटकश्वापदांच्या मांसहाडांचें, कुजलेलें सत्व, वळवाच्या पावसानें धुपून पाण्य़ाच्या पुराबरोबर वाहून ओढ्याखोड्यात वायां जाऊं नये म्हणून, आमच्या उद्योगी सरकाराने सोयीसोयीनें काळ्यागोऱ्या लष्करासह पोलीसखात्यांतील फालतु शिपायांकडून जागोजागी तालीवजा बंधारे अशा रितीने बांधावे कीं, वळवाचे पाणी एकंदर शेतांतून मुरून नंतर नदीनाल्यास मिळावें. असे केल्याने शेतें फार सुपीक होऊन एकंदर सर्व लष्करी शिपायांस हवाशिर जाग्यांत उद्योग करण्याची सवय लागल्याबरोबर त्यास रोगराईची बाधा न होतां बळकट होतील.' ('महात्मा फुले समग्र वाङ्मय' पृ. ३३३)

महात्मा फुले यांच्या विचारावरून काही निष्कर्ष काढता येतात. वळवाचा पाऊसाचे पाणी डोंगरावरून सरळ वाहू दिल्यास त्याबरोबर तेथील खतयुक्त कुजलेले सत्त्व वाहून गेल्याने जमीना पोषकद्रव्य मिळणार नाही. पाणी वाहून गेल्याने जमीनीत पाण्याचा निचरा होणार नाही. त्यामुळे भूजलसाठ्यात वाढ होणार नाही. त्याकरिता म. फुले ब्रिटिश सरकारला तालीवजा बंधारे बांधण्याच्या उपाय सूचवतात. जेणेकरून पाण्याबरोबर वाहून जाणारा गाळ थांबवल्या जाईल. त्याचा फायदा शेतकऱ्यांना शेतीसाठी होईल, तर पाणी अडवल्यामुळे ते जमिनीत झिरपून भूजल साठ्यात वाढ होऊल, तसेच तलावात पाणी जमा झाल्याने भविष्यातील पाण्याचे प्रश्न सुटतील. हे म. फुले यांचे विचार पर्यावरणपुरकच आहेत.

सदानंद देशमुख यांच्या ‘बारोमास’ आणि ‘तहान’ या कादंबऱ्यांमधून पर्यावरणासंबंधी समस्या आलेल्या आहेत. ‘बारोमास’ कादंबरीचा नायक एकनाथ पर्यावरणस्नेही आहे. त्याने स्वत: काळजी घेऊन कल्याणीच्या मळ्यात शेताच्या धुऱ्यावर झाडे लावलेली असतात. त्याचे वर्णन कादंबरीत येते, ‘लेंडीच्या काठाने कल्याणीच्या धुऱ्यावर सात–साठ तेल्या बाभळीचे फोक होते. दोन जांभळीची गर्द हिरवी झाडं होती. मळ्यात शेप्या अन् बेल्या आंब्याची दोन झाडं होती. पांदीच्या कडेने आपल्या बांधावर गोंधण, बेहडा, बोर, लिंब, चंदन अशा वेगवेगळ्या जातींच्या झाडांची दाटी होती. त्यामुळे कल्याणीचा मळा नेहमीच ताजा टवटवीत दिसायचा. ...आताशा पाखराच्या विष्ठेतून लेंडीनाल्याच्या काठाने जी चंदनाची हिरवी गर्द रोपं उगवून आली होती, त्यांना तर तो दिवसदिवसभर गोंजारत बसून वेळ घालवायचा. झाडांच्या सहवासात असला की त्याच्या मनाची उदासी संपून जायची. झाडांजवळ बसंल की त्याला मायेचा आधार मिळायचा.’ (‘बारोमास’ पृ. १६६) अशा बारमाही ऋतुरंग जपणाऱ्या झाडांवर त्याने कविताही केलेल्या असतात. त्याला जर कोणी झाडाची एकही फांदी तोडलेली खपायची नाही. तोडणाऱ्यास तो शिवा द्यायचा. परंतु एकनाथचा भाऊ मधू स्वत:च्या खर्च्यासाठी करीम मिस्त्रीला झाडे विकतो. ही गोष्ट त्याला आवडत नाही. तो मधूला म्हणतो, ‘आरे पण उभ्या झाडाचा सौदा कसा केला लेका तू. आपल्या घरी चुलीत जाळायले सरपण नसते तरी एक फांदी तोडत नाही आपुन.’ (‘बारोमास’ पृ. १६७) हे मोठ्या भावाचे म्हणणे न ऐकता मधू स्वत: हातात कुऱ्हाड घेऊन झाडावर सपासप घाव घालतो. त्यामुळे झाडावरची पाखरं, खोडावरचे हजारो मुंगळें भेदरून इकडेतिकडे तरतरू लागतात.

वरील संपूर्ण वर्णन पर्यावरणाशी निगडीत आहे. त्यात पर्यावरणच्या समस्या आलेल्या आहेत. आज मनुष्य स्वत:च्या स्वार्थासाठी पर्यावरणाचा, वृक्षवल्लींचा कसा नाश करत आहे हे दिसते. येथे माणसाचे दोन रूप दिसतात. एक पर्यावरणाची काळजी घेणारा तर दुसरा पैशासाठी ज्याने मेहनत घेऊन वृक्ष वाढवले त्यांच्या मेहनतीची कदर न करता पर्यावरणाचा ऱ्हास करणारा.

जंगलतोड केल्याने जंगलात राहणाऱ्या जंगली प्राण्यांचे निवासस्थान धोक्यात आले. त्यामुळे जंगलातील प्राणी शहरी आणि खेडेगावात शिरून नरभक्षक बनले आहे. या सर्व गोष्टींना मनुष्यच जबाबदार आहे. कारण जंगलतोडीचे परिणाम म्हणून आज जंगलातील जैवविविधतेला धोका निर्माण झाला आहे. ऑक्सिजनची मात्रा कमी होऊन कार्बन, मिथेन, कार्बनमानोऑक्साईडचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. त्याचे परिणाम म्हणून ‘ग्लोबल वार्मिंग’चे दुष्परिणाम जगाला भेडसावत आहेत. आज वाघाचे खाद्य मनुष्याने संपवले त्याचे परिणाम म्हणून वाघ मनुष्याची शिकार करू लागला आहे. भविष्यात याचे वाईट परिणाम दिसतील यात काही शंका घेण्याचे कारण नाही. तेव्हा मनुष्याने पर्यावरणाची काळजी घेणे गरजेचे आहे.

‘तहान’ कादंबरीत पाण्याचा प्रश्नावर चर्चा येते. ह्या चर्चेचे ठिकाण ठरलेले आहे. भगवान होगे ह्याच्या दुकानात ऐसपैस जागेत ह्या चर्चा रंगतात. त्यात राघोजी, लक्ष्मण होगे, भगवान होगे, गुलाबराव भालेराव, नंदू आळशी आदी सर्व गावकरी जमून पाणी, भ्रष्टाचार, लोकसंख्यावाढीचे दुष्परिणाम आदी विषयावर चर्चा करतात. जमीनीतील पाण्याची पातळी

कमी होण्याची कारणे सांगताना नंदू आळशी म्हणतो, 'त्या भुईतलं पाणी तरी किती दिवस पुरणार हाये? समद्या नसा आखडून घेतल्या भुईच्या, जागजागी हापशा अन् इहिरी झाल्या. आता समजा, एखाद्या माणसाच्या आंगातून समद रगत काढून घेतलं. त त्याच्या आंगात कुठून रगत येणार ... तसे ह्या भुईच्या पोटातून वाह्यणारे पाण्याचे नळ म्हन्जे तिच्या नसा. त्या माणसानं जागजागी कापून घेतलं त पाणी तरी कुठून येणार हाये भुईच्या पोटात?' असे विश्लेषण तो देतो. पर्यावरणाची हानी करण्यास माणूस कसा जबाबदार आहे. हे यावरून लक्षात येते. तसेच पुजांजी जुमळे ह्या व्यक्तीच्या चुकीने पारखेड गाव जळते. त्यात गाव व गावाभोवतीचे पर्यावरणाची हानी कशी होते याचे चित्रण 'तहान' कादंबरीत येते. येथे लेखक समाजाचे काय चुकते आहे. हे नेमकेपणाने सदानंद देशमुख मांडतात.

**निष्कर्ष :**

वरील सर्व वर्णनावरून असे लक्षात येते की, मराठी साहित्यात फार पूर्वीपासून पर्यावरणासंबंधी विचार मांडलेले आहेत. अनेक संत, लेखकांनी तर प्रत्यक्ष कृतीतून पर्यावरणाची स्वच्छता राखण्याचे धडे दिले. यात गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज आणि साने गुरुजी यांचे नाव अग्रक्रमाने घेता येईल. भालचंद्र नेमाडे हे देशीवादाचे पुरस्कर्ते आहेत. त्यांच्या देशीवादाच्या संकल्पनेत भूमीतत्त्व व संस्कृती या घटकांना अधिक महत्त्व आहे. त्या अनुषंगाने जागतिकीकरणाने व आधुनिकीकरणामुळे आपल्या संस्कृतीचा पर्यावरणाचा कसा ऱ्हास होत चाललेला आहे. याचे वास्तववादी चित्रण आपल्या कादंबऱ्यातून चित्रित करतात. तर सदानंद देशमुख आपल्या कथा, कादंबऱ्यातून पर्यावरणाच्या समस्या मांडतात. येणाऱ्या काळातही मराठी साहित्यात पर्यावरणीय समस्या अधिकाधिक मांडणी करून समाजात पर्यावरणासंबंधी जागरूकता निर्माण करण्याचे कार्य मराठी लेखक करतील अशी आशा करता येईल.

**संदर्भ ग्रंथ :**

- भालचंद्र नेमाडे 'हिंदू : जगण्याची समृद्ध अडगळ', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई. चौथी आवृत्ती, २०१३
- सदानंद देशमुख 'बारोमास', कॅन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, पाचवी आवृत्ती, २०१३
- सदानंद देशमुख 'तहान', कॅन्टिनेन्टल प्रकाशन पुणे, सहावी आवृत्ती, २०१२
- मारुती चितमपल्ली 'केशरचा पाऊस', साहित्यप्रसार केंद्र, नागपूर दुसरी आवृत्ती २००९
- मारुती चितमपल्ली 'निसर्गवाचन', पद्मगंगा प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती २००२
- म. फुले 'महात्मा फुले समग्र वाङ्मय' संपा. धनंजय कीर व इतर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सहावी आवृत्ती २००६